# समर्थन

## खर्चाचे पूरक विवरणपत्र विश्लेषण

### विभाग निहाय

## डिसेंबर, २०१६

### (महाराष्ट्र राज्य)

**समर्थन**
११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड स्थानकासमोर,
वसई (पू), पालघर -४०१ २०८ ✆ ०२५०-२३९०१०३/४
**विश्लेषक व संपर्क: रुपेश किर : ९८९२९३९६१७**
✉: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

# हिवाळी अधिवेशन-डिसेंबर

## खर्चाचे पूरक विवरणपत्र २०१६-१७

### ठळक वैशिष्टे:

- डिसेंबर, २०१६ च्या हिवाळी अधिवेशनात एकूण रु.९ हजार ४८९ कोटी १३ लाख ५ हजाराच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत. मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत पूरक मागणीचे प्रमाण ३.५० टक्के आहे.
- जुलै, २०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण रु.१३ हजार ३२ कोटी २१ लाख १५ हजारांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या होत्या. मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत पूरक मागणीचे प्रमाण ४.८१ टक्के होते.
- जुलै, २०१६ व डिसेंबर २०१६ च्या पुरवणी मागण्या एकत्र करता वर्ष २०१६ च्या मूळ मागणीच्या तुलनेत हे प्रमाण ८.३१ टक्के झाले आहे.
- मार्च २०१६ मध्ये शासनाने सादर केलेला अर्थसंकल्प (मूळ मागणी) रु. २ लाख ७० हजार ७६३ कोटींचा होता. जुलै व डिसेंबर २०१६ मध्ये सादर केलेल्या पूरक मागण्या मिळून एकूण मागणी आता रु. २ लाख ९३ हजार २८४ कोटी ३४ लाखाची झाली आहे.
- शालेय शिक्षण व क्रीडा, नगरविकास, उद्योग, उर्जा व कामगार, गृहनिर्माण, उच्च व तंत्र शिक्षण, कृषि व पदुम, सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास व जलसंधारण, पर्यावरण तसेच सहकार, पणन व वस्त्रोद्योग या १० विभागांवर दिनांक १३ डिसेंबर व १४ डिसेंबर, २०१६ रोजी रु.६ हजार २५३ कोटी २२ लाखांच्या (६५.५७%) पुरवणी मागण्यांवर चर्चा होणार असून उर्वरित १७ विभागांच्या रु. ३ हजार २३५ कोटी ९१ लाखांच्या (३४.४३%) मागण्या विनाचर्चा मंजूर होतील.
- आकस्मिकता निधीतून रु. ५४ कोटी ८८ लाख काढण्यात आले असून सर्वात जास्त रु. २७.६६ कोटींची रक्कम महिला व बाल विकास विभागांतर्गत काढण्यात आली आहे. ही रक्कम 'मनोधैर्य योजनेसाठी' काढण्यात आली असून या मागणीचा समावेश मूळ अर्थसंकल्पात करणे शक्य होते.

- डिसेंबर पुरवणी मागण्यांमध्ये एकूण २७ विभागांच्या ९२ मागण्यांचा समावेश असून त्यात २५८ बाबी अंतर्भूत आहेत.
- खर्चाचे पूरक विवरणपत्र डिसेंबर, २०१६ मध्ये रु. ९ हजार ४८९ कोटी १३ लाखांच्या पूरक मागण्या सादर केलेल्या २७ विभागांपैकी १)कृषि व प.दु.म. २)नगर विकास, ३)उद्योग उर्जा व कामगार, ४)गृह, व ५)सार्वजनिक बांधकाम या ५ विभागांनी सर्वात जास्त रु. ५ हजार ७१३ कोटी ९४ लाखांच्या पूरक मागण्या सादर केल्या असून त्यांचे एकूण पूरक मागणीत प्रमाण ६०.२१ टक्के आहे.
- वर्ष २०१५ च्या डिसेंबर (हिवाळी) अधिवेशनात १६ हजार ९४ कोटी १४ लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली होती. तर या डिसेंबर (हिवाळी) अधिवेशनात मध्ये ९ हजार ४८९ कोटी १३ लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे.
- राज्याचे आर्थिक नियोजन डळमळीत झाले असून कृषि व पदुम, नगर विकास तसेच उद्योग, उर्जा व कामगार या तीन विभागांसाठीच ४ हजार ५४० कोटी ९७ लाखांची तरतूद केली आहे. एकूण पुरवणी मागण्यांमध्ये ही रक्कम ४७.८५ टक्के आहे.

## डिसेंबर, २०१६ च्या महसुली व भांडवली पुरवणी मागण्या

*तक्ता क्र. १* *( रु. कोटीत )*

| मागण्यांचा प्रकार | भारित | दत्तमत | एकूण |
|---|---|---|---|
| महसुली | ४६२.३२ | ७,९६६.४६ | ८,४२८.७९ |
| भांडवली | - | १,०६०.३३ | १,०६०.३३ |
| एकूण | ४६२.३२ | ९,०२६.८० | ९,४८९.१३ |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र-डिसेंबर, २०१६*

- डिसेंबर २०१६ मध्ये वर्ष २०१६-१७ साठी रु. ९ हजार ४८९ कोटी १३ लाखांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत, यामध्ये दत्तमत स्वरुपाच्या रु. ९ हजार २६ कोटी ८० (९५.१२ टक्के) लाखांच्या पुरवणी मागण्या आहेत. तर भारित स्वरुपाच्या रु. ४६२ कोटी ३२ (४.८८ टक्के) लाखांच्या पुरवणी मागण्यांचा समावेश आहे.

## मूळ मागणीच्या तुलनेत डिसेंबर पुरवणी मागणीचे प्रमाण ३.२४ टक्के

*तक्ता क्र. २* *(रुपये कोटीत)*

| मागण्या | रक्कम | एकूण मागणीशी प्रमाण |
|---|---|---|
| मार्च, २०१६ मूळ मागणी | २,७०,७६३.९३ | ९२.३२ |
| जुलै, २०१६ पूरक मागणी | १३,०३२.२१ | ४.४४ |
| डिसेंबर, २०१६ पूरक मागणी | ९,४८९.१३ | ३.२४ |
| एकूण मागणी | २,९३,२८५.२७ | १००.०० |

*स्त्रोत: वित्त विषयक विवरण पत्र व खर्चाचे पूरक विवरण पत्र-जुलै व डिसेंबर, २०१६*

- राज्याचा एकूण अर्थसंकल्प (मूळ मागणी) रु. २ लाख ७० हजार ७६३ कोटी ९३ लाख एवढा होता. जुलै, व डिसेंबर, २०१६ मध्ये सादर केलेल्या पूरक मागण्या मिळून रु. २ लाख ९३ हजार २८५ कोटी २७ लाख झाला आहे.
- वर्ष २०१६-१७ च्या मूळ मागणीच्या तुलनेत जुलै व डिसेंबर पुरवणी मागणीचे प्रमाण ८.३१ टक्के झाले आहे तर आता पर्यंतच्या एकूण मागणीच्या तुलनेत हे प्रमाण ७.६८ टक्के झाले आहे.

## सर्वाधिक पुरवणी मागण्या केलेले विभाग

*तक्ता क्र. ३* *(रु. कोटीत)*

| विभाग व विभागांची संख्या | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मूळ मागणी | पुरवणी मागणीचे मूळ मागणीशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| कृषि व पदुम | ४ | १,७१५.८५ | ७,६८५.६८ | २२.३२ |
| नगर विकास | ३ | १,४७५.०२ | १७,७६२.१३ | ८.३० |
| उद्योग,उर्जा व कामगार | ४ | १,३५०.१० | ९,८४०.१९ | १३.७२ |
| गृह | ७ | ६३६.६८ | १५,०९०.६७ | ४.२१ |
| सार्वजनिक बांधकाम | ५ | ५३५.७६ | १०,१७५.९० | ५.२६ |
| ५ | २३ | ५,७१३.४१ | ६०,५५४.५७ | ९.४३ |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र- डिसेंबर, २०१६ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज-भाग–२*

- खर्चाचे पूरक विवरणपत्र डिसेंबर, २०१६ मध्ये रु. ९ हजार ४८९ कोटी १३ लाखांच्या पूरक मागण्या सादर केलेल्या २७ विभागांपैकी १)कृषि व प.दु.म. २) नगर विकास, ३)उद्योग उर्जा व कामगार, ४) गृह, व ५)सार्वजनिक बांधकाम या ५ विभागांनी सर्वात जास्त रु. ५ हजार ७१३ कोटी ९४ लाखांच्या पूरक मागण्या सादर केल्या असून एकूण पुरवणी मागणीत त्याचे प्रमाण ६०.२१ टक्के आहे. तर त्यांच्या मूळ मागणीमध्ये त्यांचे सरासरी ९.४३ टक्के आहे.

# आकस्मिकता निधीतून काढले ५४ कोटी ८८ लाख

## त्यापैकी महिला व बाल विकास विभागाचा वाटा २७ कोटी ६६ लाख

*तक्ता. क्र. ४* *(रु. लाखात)*

| विभाग | बाब क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|
| **सामान्य प्रशासन** | ३ | स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीवरील खर्च | १००.०० |
| **गृह** | २२ | वाहन चालविण्यासाठी चाचणी घेण्यासाठी कृत्रिम चाचणी पथ बांधणे. | ८४.७८ |
| **महसूल व वन** | ३४ | शासकीय प्रयोजनासाठी खाजगी जमीन मालकांकडून जमीन संपादन. | ६९.६६ |
| | ३८ | राज्यात, राज्य आपत्ती प्रतिसाद दल स्थापन करणे | ५९४.८८ |
| **कृषि व पदुम** | ५१ | हवामान अनुकूक कृषि प्रकल्पासाठी तरतूद करणे | १५०.०० |
| | ५७ | नवीन वाहनांच्या खरेदीसाठी तरतूद | ६०.०० |
| **वित्त विभाग** | ८७ | मराठवाडा विभागातील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी निवृत्तीवेतन देण्यासाठी तरतूद. | ६७५.९९ |
| **जलसंपदा विभाग** | ११३ | विदर्भातील कोटगल बंधाऱ्याचे प्राथमिक सर्वेक्षण करण्यासाठी तरतूद | ५.०० |
| **वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य** | १८२ | सजीव अवयवदान अभियान २०१६ साठी तरतूद | १००.०० |
| **आदिवासी विकास** | २०७ | ग्राम बाल विकास योजनेसाठी तरतूद | ४००.०० |
| **महिला व बाल विकास** | २३५ | मनोधैर्य योजनेसाठी तरतूद | २,७६६.३३ |
| | २४४ | महाराष्ट्र राज्य विरुद्ध सृष्टी नर्सरी सिस्टीम खटला-हुकूमनामा रक्कम | ४८१.८१ |
| | | **एकूण** | **५,४८८.४५** |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र- डिसेंबर, २०१६*

- **वर्ष २०१६-१७ साठी अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण रु. ९ हजार ४८९ कोटी १३ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या आहेत, त्यापैकी आकस्मिकता निधीतून ९ विभागाअंतर्गत रु. ५४ कोटी ८८ लाख ४५ हजार काढण्यात आले आहेत. एकूण पुरवणी मागण्यांमध्ये याचे प्रमाण ०.५७ टक्के आहे.**
- **आकस्मिकता निधीतून सर्वात जास्त रु. २७.६६ कोटींची रक्कम महिला व बाल विकास विभागांतर्गत काढण्यात आली आहे. ही रक्कम 'मनोधैर्य योजने'साठी काढण्यात आली असून या मागणीचा समावेश मूळ अर्थसंकल्पात करणे शक्य होते.**

✍ मराठवाडा विभागातील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी निवृत्ती वेतन देण्यासाठी रु.६ कोटी ७५ लाख ९९ हजारांची तरतूद करण्यात आली आहे ही रक्कम आकस्मिकता निधीतून काढली असून यासाठी मूळ अर्थसंकल्पात तरतूद करणे गरजेचे होते. आकस्मिकता निधी हा पूर, दुष्काळ किंवा तातडीचा खर्च भागविण्यासाठी वापरणे गरजेचे असते. मात्र अशा प्रकारे आकस्मिकता निधीतून रक्कम काढणे हा आकस्मिकता निधी नियमांचा भंग आहे.

## ३ हजार २३५ कोटी ९४ लाख रुपयांच्या मागण्या विनाचर्चा मंजूर होणार!

### तर दोन दिवसात रु. ६ हजार २५३ कोटी १९ लाखांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा

*तक्ता. क्र. ५* *(रु. कोटीत)*

| विभाग व विभागांची संख्या | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मूळ मागणी | पुरवणी मागणीचे मूळ मागणीशी % |
|---|---|---|---|---|
| **१३ डिसेंबर, २०१६** | | | | |
| शालेय शिक्षण व क्रीडा | २ | ९४.२६ | ४२,६२१.४३ | ०.२२ |
| नगर विकास | ३ | १,४७५.०२ | १७,७६२.१३ | ८.३० |
| उद्योग उर्जा व कामगार | ४ | १,३५०.१० | ९८४०.१९ | १३.७२ |
| गृह निर्माण | १ | - | ३६९.२१ | ०.०० |
| उच्च व तंत्र शिक्षण | ४ | ३५१.१९ | ६८२७.८५ | ५.१४ |
| **१४ डिसेंबर, २०१६** | | | | |
| कृषि, पदुम | ४ | १,७१५.८५ | ७६८५.६८ | २२.३२ |
| सार्वजनिक बांधकाम | ३ | ५३५.७६ | १०,१७५.९० | ५.२६ |
| ग्रामविकास व जलसंधारण | २ | ५७१.३१ | १४,७३४.४३ | ३.८७ |
| पर्यावरण | १ | २५.९९ | २४.३८ | १०६.६० |
| सहकार, पणन व वस्त्रोद्योग | ३ | १३३.७१ | १,२२७.८० | १०.८९ |
| **एकूण** | **२७** | **६,२५३.१९** | **१,११,२६९.००** | **५.६१** |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र - डिसेंबर, २०१६ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज-भाग-२*

✍ शालेय शिक्षण व क्रीडा, नगर विकास, उद्योग, उर्जा व कामगार, गृहनिर्माण, उच्च व तंत्र शिक्षण, कृषि व पदुम, सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास व जलसंधारण, पर्यावरण आणि सहकार, पणन व वस्त्रोद्योग या १० विभागांच्या रु.६ हजार २५३ कोटी १९ (६५.९०%) लाखांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा होणार असून *१७ विभागांच्या रु. ३ हजार २३५ कोटी ९४ (३४.१०%) लाखांच्या मागण्या विनाचर्चा मंजूर होतील.*

# २ वर्षात हिवाळी अधिवेशनात रु. २५ हजार ५८३ कोटींच्या पुरवणी मागण्या

## मागील ७ वर्षात डिसेंबर (हिवाळी) अधिवेशनात

## रु. ६४ हजार ३४९ कोटींच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या.

*आलेख क्र. १*




*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र- डिसेंबर, २०१६*

- वर्ष २०१०-११ ते २०१६-१७ या ७ वर्षाच्या कालावधीत रु. ६४ हजार ३४९ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या त्यापैकी आघाडी शासनाने ५ वर्षात रु. ३८ हजार ७६६ (६०%) कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या होत्या. आताच्या युती शासनाच्या काळात म्हणजे मागील २ वर्षात रु. २५ हजार ५८३ (४०%) कोटींच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या आहेत.
- मागील ७ वर्षात सादर झालेल्या रु. ६४ हजार ३४९ कोटींच्या पुरवणी मागण्यांमध्ये आघाडी शासनाच्या ५ वर्षातील पुरवणी मागणीचे प्रमाण (६०%) तर युती शासनाच्या अवघ्या २ वर्षातील पुरवणी मागण्यांचे प्रमाण (४०%) आहे, यावरून युती शासनाच्या आर्थिक नियोजनाची कल्पना येते.
- वर्ष २०१०-११ ते २०१४-१५ या आघाडी शासनाच्या काळात सरासरी रु. ७ हजार ७५३ कोटी पुरवणी मागण्यांद्वारे काढण्यात आलेत तर आताच्या युती शासनाच्या काळात मागील २ वर्षात सरासरी रु.१२ हजार ७९१ कोटी काढण्यात आले आहे.

# चर्चेला असलेल्या विभागांसाठी बाबनिहाय मुद्दे

## १३ डिसेंबर, २०१६

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## पूरक मागणी क्र.ई-२
## २२०२, सर्वसाधारण शिक्षण

**बाब क्र. ५८ नवीन अशासकीय माध्यमिक शाळा उघडणे व अशासकीय माध्यमिक शाळांमध्ये जादा तुकड्या उघडणे याकरीता खाजगी शाळांना सहाय्यक अनुदाने (वेतन) देण्यासाठी तरतूद.**

- वर्ष २०१६-१७ च्या मूळ अर्थसंकल्पात सदर योजनांसाठी अनुक्रमे रु. ४४ कोटी ९७ लाख व ६२ कोटी ७४ लाख अंदाजित करण्यात आले होते. दि. १९ सप्टेंबर, २०१६ रोजी नुसार खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी पुरवणी मागणीद्वारे या योजनांसाठी रु. ७१ कोटी ५० लाखांची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद नवीन अशासकीय माध्यमिक शाळा उघडणे व अशासकीय माध्यमिक शाळांमध्ये जादा तुकड्या उघडण्यासाठी लागणारे अनुदान (वेतन) देण्यासाठी शासनाने तरतूद केली आहे.
- एकीकडे मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा; तर दुसरीकडे आकाशाला गवसणी घालणाऱ्या देणग्या खाजगी शाळांना भरघोस अनुदाने व प्रवेश शुल्कास अभय या शासनाच्या दुटप्पी भूमिकेमुळे वर्तमान शिक्षण व्यवस्था भ्रष्टाचार आणि काळ्या धनास पूरक ठरताना दिसत आहे. त्यामुळे शिक्षण सम्राट व सरकार यामध्ये अभद्र युती झाल्याचे दर्शन होत आहे. आज राज्यात ३ लाख ८७ हजार ५९६ विद्यार्थी पटावरून गायब झाले आहेत असा 'यु-डायस'चा २०१४-१५ व २०१५-१६ चा अहवाल सांगतो. या दोन वर्षातील यु-डायसचा अभ्यास केला असता मुंबई १ लाख ४३ हजार २६३, पुणे १७ हजार ५४२, बीड १३ हजार ८१७, औरंगाबाद १३ हजार २४३ नागपूर ११ हजार ६५७, जळगाव ११ हजार ३९१, पालघर ११ हजार ३२७ सोलापूर १० हजार ५१३ व सिंधुदुर्ग १०१ विद्यार्थ्यांची गळती झाल्याचे चित्र पुढे आले आहे. यावरून शासनाने आखलेली शाळाबाह्य मुलांची शोध मोहीम पूर्णपणे अपयशी ठरल्याचे दिसून येते.

- आज राज्यात सुमारे ८ लाखांच्या दरम्यान शाळाबाह्य मुले असल्याचे विविध संस्था-संघटना सांगत असतानाही मागील वर्षी ६० हजार शाळाबाह्य मुले शोधण्याचा बाऊ करण्यात आला, परंतु आता ही शोध मोहीम बासनात गुंडाळून ठेवल्याचे दिसून येत आहे. म्हणूनच या सरकारला सर्व शाळा आणि शिक्षण व्यवस्थाच खाजगी व्यवस्थापनाच्या ताब्यात कशी जाईल? यासाठी प्रयत्न चालले असल्याची शंका आता संस्था-संघटना, शिक्षक व पालकांच्या मनात निर्माण झाली आहे. त्यामुळे केवळ आपल्या मर्जीतील खाजगी शाळांना अनुदान देण्याबरोबरच शासकीय शाळांमधील विद्यार्थी, त्या शाळांमधील शिक्षकांचे प्रश्न कसे सुटतील व शासकीय शाळांमधील मूलभूत सोयी-सुविधा कशा निर्माण होतील यासाठी शासनाने ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे.

**बाब क्र. ६१ व ६२ शिक्षक प्रशिक्षण योजनेसाठी अनुक्रमे रु. ३ कोटी ६४ लाख व १ कोटी १३ लाखांची तरतूद.**

- या दोन्ही योजनांसाठी अनुक्रमे १३ कोटी ५० लाख रुपये व ४ कोटी ३५ लाख रुपये अशी एकूण १७ कोटी ८५ लाख रुपयांची मूळ मागणी करण्यात आली होती. आता डिसेंबर पुरवणी मागणी द्वारे ४ कोटी ७७ लाख रुपये काढण्यात आले आहेत ही रक्कम मूळ मागणीच्या २७ टक्के आहे.
- केवळ प्राथमिक शाळांचा विचार करता राज्यात ९८ हजार २१३ शाळा कार्यरत आहेत या शाळांमधून ६ लाख ५६ हजार ६७३ शिक्षक ज्ञानदानाचे काम करीत आहेत. त्यापैकी खाजगी शाळांमधून शिकविणाऱ्या शिक्षकांची संख्या ३ लाख ९७ हजार ४७८ आहे. या शिक्षकांना मागील वर्षी म्हणजे २०१४-१५ मध्ये प्राथमिक शिक्षकांना १३.८ टक्के, प्राथमिक व उच्च प्राथमिक ९.७ टक्के तर प्राथमिक ते उच्च माध्यमिक १.३ टक्के शिक्षकांना शैक्षणिक प्रशिक्षण मिळाले होते. तर इतर शिक्षकांना प्रशिक्षण मिळू शकलेले नाही. यावरून आपल्याला शिक्षणाची गुणवत्ता काय आहे याचा अंदाज येतो. असे असताना आपण शिक्षकांकडून कोणती अपेक्षा ठेवणार? शासनाने २४ नोव्हेंबेर २००१ साली राज्यातील एकाही शाळेला अनुदान मिळणार नाही असा निर्णय घेतला मात्र विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता दिल्यानंतर संबंधित संस्थाचालक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन देतात का? दिले तर किती देतात? याची पाहणी मात्र केली नाही. त्यामुळे गेल्या १० ते १५ वर्षापासून हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विना

वेतन काम करीत आहेत. २००९ साली ‘कायम’ शब्द काढल्यानंतर अनुदानाचा मार्ग मोकळा झाला होता. मात्र शासकीय अधिकाऱ्यांनी अनुदान मिळण्यासाठी जाचक अटी टाकल्या त्याचे पालन करीत ५८ शाळांना अनुदान मिळाले मात्र त्यानंतर पात्र ठरलेल्या १ हजार ६२८ शाळा व त्यातील १९ हजार २४२ शिक्षक अद्यापही अनुदानाच्या प्रतिक्षेत आहेत.

- शासनाने जाहीर केलेल्या संचमान्यतेच्या अहवालानुसार राज्यातील सर्वच जिल्ह्यातील शाळांच्या संचमान्यतेत अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांची संख्या ही ४ हजार २२९ इतकी दाखविण्यात आली आहे. ही यादी केवळ खाजगी माध्यमिक शाळांतील शिक्षकांची आहे. यात प्राथमिक-उच्च प्राथमिकची यादी नाही. ही यादी आल्यास जवळ जवळ ३० ते ४० हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत. यातून मराठी माध्यमाच्या व राज्य मंडळाच्या शाळा बंद केल्या जातील हे स्पष्ट दिसून येते.
- नागपुरात ‘शिक्षणाची वारी’ नावाचा दोन दिवसांचा कार्यक्रम शिक्षण विभागाने आयोजित केला होता. ही वारी म्हणजे काही ठराविक शिक्षकांचा सत्कार, त्यांच्या उपक्रमाचा गाजावाजा असे या कार्यक्रमाचे सर्वसाधारण स्वरुप आहे. याच दरम्यान अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून राज्यातील लाखो शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आश्रमशाळा शिक्षक इत्यादी आपल्या वेतनापासून ते अनेक प्रलंबित प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी नागपूरच्या रस्त्यावर आंदोलने, धरणे करीत होते. यात संगणक शिक्षकांनी तर शिक्षण मंत्री आपल्याकडे लक्ष देत नाहीत, म्हणून आंदोलन थोडे तीव्र केल्याने मोठ्या प्रमाणात पोलिसांच्या लाठ्या -काठ्याही खाव्या लागल्या.
- आज राज्यात ज्या सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आहेत त्यांचा एकूण प्रवास लक्षात घेतला तर ‘सर्व शिक्षा अभियाना’च्या माध्यमातून पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांकडे आणि त्यामध्ये होणाऱ्या गैरव्यवहाराकडे शासनाने कधीही गांभीर्याने पाहिलेले नाही. त्याचे अनेक परिणाम या शाळांवर आणि पटसंख्यांवर झालेले आहेत.
- शिक्षणाबाबत ‘लोकलेखा समितीने’ सुचविलेल्या सूचनांकडे केवळ सरकारनेच नाही तर शिक्षक व संस्थाचालकांनी डोळे उघडून बघण्याची गरज आहे. शिक्षक हा एक पिढी घडवत असतो. त्यामुळे शिक्षकांच्या समस्येकडे सरकारने बेफिकिरीने न पाहता काहीतरी ठोस निर्णय घेण्याची गरज आहे.

## इयत्ता नववीत अडीच लाख मुले अनुतीर्ण

इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत पुढच्या वर्गात आलेली मुले इयत्ता नववीच्या वर्गात मोठ्या प्रमाणात अनुत्तीर्ण होत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. यू-डायसच्या आकडेवारीनुसार शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये १९ लाख ७० हजार ५१४ विद्यार्थी नववीच्या वर्गात होते. मात्र त्यातील १७ लाख २७ हजार ५५९ विद्यार्थीच गेल्या वर्षी म्हणजे २०१५-१६ या वर्षात दहावीच्या वर्गात प्रवेश घेऊ शकले. त्यानुसार २ लाख ४२ हजार ९५५ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे नववीच्या वर्गात नापास करीत नसल्याचे शाळांच्या दाव्यात तथ्य नसल्याचे आकडेवारीवरून समोर आले आहे.

- यावरून शासनाचे पहिली ते ८वी इयत्तेपर्यंत नापास न करण्याचे धोरण अयोग्य अंमलबजावणीमुळे फसले असल्याचे दिसून येते.

*-लोकसत्ता, १५ नोव्हेंबर, २०१६*

## उद्योग, उर्जा व कामगार विभाग
## पूरक मागणी क्र. के-८
## ३४५१, सचिवालय-आर्थिक सेवा
## व के-१०
## ४८७५, इतर उद्योगावरील भांडवली खर्च

**बाब क्र.१२६ व १२७ उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या कार्यालयीन वापराकरीता नवीन वाहने खरेदी करण्यासाठी तसेच औद्योगिक पायाभूत सुविधांचा विकास व निर्मिती यांच्यासाठी खर्च भागविण्यासाठी अनुक्रमे १० लाख रुपये व ४० कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद**

- कार्यालयीन खर्च भागविण्यासाठी १५ कोटी ४८ लाखांची तरतूद करण्यात आली होती तर औद्योगिक पायाभूत सुविधांचा विकास व निर्मिती यासाठीचा खर्च भागविण्यासाठी मूळ अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद करण्यात आली नव्हती.
- शासनाने महापालिका-नगरपालिका सफाई कामगार, परिवहन, अग्निशामक कामगार, जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद सफाई कामगार, सुरक्षा रक्षक या कंत्राटी कामगारांचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यात शासकीय व निम शासकीय आस्थापना तसेच सर्व प्रकारच्या स्थानिक स्वराज्य

संस्थांमधील कर्मचारी भरती शासनाने जवळपास बंद केली आहे. त्यामुळे सर्वत्र मोठ्या प्रमाणावर रिक्त जागा आहेत.

- ‘समान कामाला समान दाम’ या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा सर्रास भंग होत आहे. आरोग्य सेवेत ग्रामीण भागात काम करणाऱ्या अस्थायी बी.ए.एम.एस. डॉक्टर व इतर कर्मचारी, नर्स, अंगणवाडी सेविका व रोजगार हमी सेवक यांना तुटपुंज्या वेतनावर काम करावे लागत आहे. या सर्व कर्मचाऱ्यांची कामे कंत्राटी पद्धतीने करून घेण्याचे सरकारचे धोरण आहे. या धोरणांमुळे कंत्राटी कामगारांचे शोषण होत असून भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे शासनाने कंत्राटी कामगार कायद्यात आणि किमान वेतन कायद्यात तात्काळ बदल करण्याची गरज आहे. शासनाने तात्काळ या सर्व कामगारांना कायम करावे मात्र या सर्व कंत्राटी कामगारांना कायम करेपर्यंत कायम स्वरुपी कामगारांना मिळणाऱ्या वेतनासह सर्व सुविधा देण्याचे धोरण शासनाकडून आखण्यात यावेत.

## कंत्राटी कामगारांचे शोषण थांबवा!

शासनाने सर्व कंत्राटी कामगारांचे शोषण थांबवून त्यांना कायमस्वरुपी कामगारांचे लाभ दिले पाहिजेत. मात्र सरकारचे धोरणच कामगारांच्या दृष्टीने चुकीचे असल्याने राज्यव्यापी आंदोलन उभारण्याची गरज आहे. शासनाने तात्काळ या कंत्राटी कामगारांना सर्व कायमस्वरुपी कामगारांना मिळणाऱ्या वेतनासह सर्व सुविधा देण्याचे धोरण आखण्यासाठी भाग पाडले पाहिजे अशी मागणी श्रमजीवी संघटनेचे संस्थापक विवेक पंडित यांनी केले आहे.

- *महाराष्ट्र टाईम्स, दि. २५ ऑक्टोबर, २०१६*

## नरकवास संपता संपेना

### सफाई कामगारांसाठी पाच वर्षांत केवळ दोन वसाहती

मुंबई महापालिकेतील सफाई कामगारांच्या वसाहतींसाठी ‘आश्रय योजना’ सुरू करण्याची घोषणा सहा वर्षापूर्वी झाली. यासाठी तब्बल १८०० कोटी रुपये खर्च करण्याची तयारी प्रशासनाने दर्शवली. मात्र पाच वर्षात केवळ दोनच वसाहतींच्या पुनर्विकासाची तयार झाली आहे. या योजनेतून सुमारे ४०० ते ५०० घरे उभी राहणार असून उर्वरित सुमारे ६००० कामगारांचा नरकवास आणखी अनेक वर्षे सुरू राहणार असल्याचे दिसून येत आहे.त्यांनी आणखी किती वर्षे निवाऱ्याच्या विवंचनेत त्रस्त राहायचे, याचा विचार व्हायला हवा.

- *‘आश्रय’योजनेचा लाभ पालिका प्रशासन उर्वरित सहा हजार कामगारांना कधी देणार हा खरा प्रश्न आहे.*

- *महाराष्ट्र टाईम्स,दि. १७ ऑक्टोबर, २०१६*

## ‘किमान वेतना’कडून शोषणाकडे

किमान वेतन कायद्याच्या कक्षेत येणाऱ्या कामगारांना मिळणारा महागाई भत्ता गेल्या काही वर्षात कमी होऊ लागला आहे. पण त्या वेतनाच्याही पलीकडे कंत्राटी वर्गाचे शोषण वाढते आहे. सरकारी कर्मचारी/ अधिकारी यांना मिळालेली वेतनवाढ या वर्गाकडे झिरपत नाही. नवे कायदेही असंघटीत कामगारांना दुर्लक्षित करणारेच आहेत. तर कायम असुरक्षित असलेल्या असंघटीत कंत्राटी कामगारांना रोजगारासाठी प्रशिक्षणाचे आमीष दाखवणाऱ्या संस्था मात्र दिवसागणिक वाढत आहेत.

➢ *याबाबत कामगार मंत्री कोणती ठोस भूमिका घेणार आहेत.*

*-लोकसत्ता, दि. १७ ऑगस्ट, २०१६*

## उच्च व तंत्रशिक्षण विभाग

### पूरक मागणी क्र. डब्ल्यू-३

### २२०३, तंत्रशिक्षण

**बाब क्र. २२६. शासकीय तंत्रनिकेतनांनानतचा विविध प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी रु. ६३ लाखांची अतिरिक्त तरतूद.**

- सदर खर्च भागविण्यासाठी मूळ अर्थसंकल्पात ३०५ कोटी ९७ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. आता डिसेंबरच्या पुरवणीद्वारे त्यात ६३ लाख रुपयांची वाढ करण्यात आली आहे. असे असताना सध्या ‘डिजिटल महाराष्ट्र’ आणि ई गव्हर्नन्सची कोट्यवधी रुपये खर्चून जाहिरातबाजी केली जात आहे. मात्र शासनाच्या ४३ तंत्रनिकेतन विद्यालयांच्या प्राचार्यांकडून अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी संगणकांची वारंवार मागणी केली जात असताना गेल्या २ वर्षात संगणक खरेदीच करण्यात आली नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. गतिमान सरकारच्या गप्पा मारणाऱ्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा भोंगळ कारभार सातत्याने उघडकीस येत असून अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कालबाह्य झालेल्या संगणकांवर प्रशिक्षित केल्यावर उद्या नोकरी-उद्योगात ते कोणते ‘कौशल्य विकास’ दाखवणार हा खरा सवाल आहे. तसेच नोकरीच्या बाजारात त्यांच्या ज्ञानाची किंमत काय असणार हा खरा प्रश्न आहे.
- शासनाच्या ४३ तंत्रनिकेतन विद्यालयाकडून २ वर्षे सातत्याने संगणकांची मागणी करण्यात येत आहे. त्या साठी प्रस्ताव पाठविण्यात येत आहेत. मात्र उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयातून त्याला हिरवा कंदील काही दाखविण्यात येत नाही. साधारणपणे संगणकांच्या खरेदीसाठी १३ कोटींची आवश्यकता असताना सर्व

तंत्रशिक्षण महाविद्यालयांच्या उपकरण व सामग्रीच्या खरेदीसाठी केवळ ८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे केवळ संगणकच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांतर्गत येणारी अनेक उपकरणेही खरेदी करता येत नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यामुळे शासन नेमक्या कोणत्या कौशल्याचा विकास करण्यात गर्क आहे हे पाहणे गरजेचे ठरणार आहे.

## 'डिजिटल महाराष्ट्रा'च्या युगात जुन्याच संगणकाचा वापर

### शासनाच्या ४३ तंत्रनिकेतन विद्यालयांमधील परिस्थिती; दोन वर्षात खरेदीच नाही

राज्यातील भाजप-शिवसेना सरकारला दोन वर्षे पूर्ण होत असताना 'डिजिटल महाराष्ट्र' आणि ई-गव्हर्नन्सची कोट्यावधी रुपये खर्चून जाहिरातबाजी केली जात आहे. मात्र शासनाच्याच ४३ तंत्रनिकेतन विद्यालयांच्या प्राचार्यांकडून अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी संगणकांची वारंवार मागणी केली जात असताना गेल्या २ वर्षात संगणक खरेदीच करण्यात आली नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

*–लोकसत्ता, दि. २२ ऑक्टोबर, २०१६*

**बाब क्र. २२७. ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १ लाखापेक्षा अधिक नाही अशा व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ५० टक्के फी माफी करण्यासाठी ३५० कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद.**

- मूळ अर्थसंकल्पात या योजनेसाठी ३२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. आता पुरवणी मागणीद्वारे ३५० कोटी रुपये देऊन ही रक्कम ६७० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. शासनाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून उत्पन्न मर्यादा एक लाखाहून अडीच लाख रुपयांपर्यंत वाढवली आहे. तर शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीची मर्यादा सहा लाखापर्यंत केली आहे. तथापि ज्या अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापनासह विविध महाविद्यालयात ही योजना राबविण्यात येते. अशा महाविद्यालयांच्या शुल्क प्रतिपूर्तीपोटी तब्बल १२०० कोटी रुपये थकविल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. त्यामुळे सरकारने वेळेवर पैसे दिले नाहीत तर संस्था चालवायच्या कशा, असा प्रश्न अभियांत्रिकी महाविद्यालयापुढे निर्माण झ़ाला आहे.
- राज्यातील अनेक अभियांत्रिकी महाविद्यालयांना शासनाकडून फी प्रतिपूर्तीचे पैसे वेळेवर मिळत नसल्याने या महाविद्यालयातील अध्यापकांना चार ते सहा महिने वेतन मिळालेले नाही. त्याचप्रमाणे समाज कल्याण

व आदिवासी विभागाची थकबाकी सुमारे १२०० कोटी रुपये असल्याची माहिती अधिकारीच देत आहेत. उच्च शिक्षणाचा लाभ आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी 'ईबीसी' मर्यादा वाढवली असली तरी अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या फी प्रतिपूर्तीचे वर्ष २०१५-१६ चे ४६५ कोटी रुपये संबंधित महाविद्यालयांना मिळालेले नाहीत.

## आर्थिक दुर्बलांच्या उच्चशिक्षणाचा भार सरकार उचलणार

### घोषणा मोठ्या थकबाकी १२०० कोटींची

शासनाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून उत्पन्न मर्यादा १ लाखावरून २.५ लाखांपर्यंत वाढवली आहे. तथापि अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापनासह विविध महाविद्यालयांमध्ये ही योजना राबविण्यात येते अशा महाविद्यालयांच्या शुल्क प्रतिपूर्तीपोटी तब्बल १२०० कोटी रुपये शासनाने थकविल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. त्यामुळे सरकारने वेळेवर पैसे दिले नाहीत तर संस्था चालवायच्या कशा, असा प्रश्न अभियांत्रिकी महाविद्यालयांपुढे निर्माण झाला आहे.

*-लोकसत्ता, १४ ऑक्टोबर, २०१६*

## १४ डिसेंबर, २०१६
## सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
## पूरक मागणी क्र. व्ही-३
## ४४२५, सहकारावरील भांडवली खर्च

**बाब क्र. २२२ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भाग भांडवलासाठी रु.१००० लाक्षणिक मागणी.**

- जिल्हा मध्यवर्ती बँकांना भाग भांडवली अंशदानासाठी मूळ अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही डिसेंबर पूरवणी मागणी मध्ये १ हजार रुपयांची लाक्षणिक मागणी करण्यात आलेली आहे. ही मागणी राज्यातील १६ जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकांचा बँक परवाना रद्दीकरण टाळण्यासाठी करण्यात आली आहे. आज राज्यातील सहकार चळवळीलाच उतरण लागली आहे. राज्यात मागील एका वर्षात सहा हजार सहकारी संस्था बंद पडल्या आहेत. तर रु. २ लाख २५ हजारांपैकी ५३ हजार २४२

संस्था तोट्यात आहेत. तर सर्व सहकारी संस्थांकडे तब्बल एक लाख रु. ४८ हजार ४८९ कोटींची कर्जाची रक्कम येणे बाकी आहे.

- राज्याच्या सहकारी शिखर संस्था असलेल्या राज्य सहकारी बँकेचे खेळते भांडवल तीन हजार कोटी रुपयांनी घसरले आहे. तर वर्ष २०१४ मध्ये असलेल्या १३,४७५ कोटीं रुपयांच्या ठेवी वर्ष २०१५ अखेर ९,९९३ कोटी रुपयांपर्यंत घसरल्या आहेत.
- राज्यातील २ लाख २५ हजार सहकारी संस्थांतील सरकारचे भाग भांडवल देखील ५ हजार ८०८ कोटीं रुपयांवरून ४ हजार २१४ कोटी रुपयांवर आले आहे. म्हणजे १ हजार ५९४ कोटी रुपयांची घट या युती शासनाच्या काळात झाली आहे. त्यामध्ये सहकारी दुग्ध संस्था, प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्था, कापूस पिंजणी संस्था, सूतगिरण्या व सहकारी हातमाग यांचा प्रामुख्याने सहभाग आहे. त्यामुळे एकूणच गरीब शेतकऱ्यांच्या सहकारालाच घरघर लागली आहे.
- तसेच राज्य सहकारी बँकेत जो १६०० कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे त्या संदर्भात चौकशी अधिकाऱ्यांसमोर गेल्या एक वर्षापासून प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास बँक टाळाटाळ करीत असल्याचे धक्कादायक बाब समोर आली असल्याने सरकारने स्वत: हस्तक्षेप करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी.

## सहकारमंत्र्यांच्या ‘लोकमंगल’ मध्ये घोटाळा

## सुभाष देशमुखांसह संचालकांना ७४ कोटी सव्याज परताव्याचे आदेश

सहकारमंत्री सुभाष देशमुख यांच्या ‘लोकमंगल ॲग्रो’ या कंपनीने साखर कारखान्यांसाठी ४ हजार ७५१ गुंतवणूकदारांकडून जमविलेली तब्बल ७४.८२ कोटी रुपयांची गुंतवणूक सेबीच्या नियमांविरुद्ध असल्याने ही रक्कम शेतकऱ्यांना सव्याज परत करण्याचे आदेश सेबीने दिले आहेत. शेतकऱ्यांची झालेली ही फसवणूक थेट सुब्रतो राय यांनी केलेल्या घोटाळ्यासारखीच असल्याचे नमूद करून लोकमंगल ॲग्रोच्या १२ संचालकांना रोखे बाजारात व्यवहार बंदी करण्याचे आदेश सेबीकडून देण्यात आले आहेत.

*-लोकसत्ता, १७ ऑगस्ट, २०१६*

# समर्थनची प्रकाशने

- प्रगतिपुस्तक महाराष्ट्राचे! विकासाची बेटे . . . दारिद्र्याचा महासागर . . . (डिसेंबर २०१०)
- आदिवासी उपयोजना संक्षिप्त अहवाल (मार्च २०१०)
- महाराष्ट्र विधिमंडळाच्या विषय समित्यांची शोकांतिका अहवाल
- महाराष्ट्रातील निवडक क्षेत्रांचा आढावा (२००९)
- राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या मार्गदर्शक सूचना (२००९)
- आदिवासी उपयोजना संदर्भ पुस्तिका
- सत्तेच्या सारीपाटावरील योजनांचे काय?
- मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३
- प्रसारमाध्यम - ॲडव्होकसी अभ्यास
- माहितीचा अधिकार - मार्गदर्शिका
- आदिवासी स्वशासन कायदा
- अत्याचार प्रतिबंधक कायदा
- महात्मा फुले शिक्षण हमी योजना माहितीपुस्तक
- रोजगाराची हमी धोक्यात
- विधिमंडळ - रचना व कार्यपद्धती
- राष्ट्रीय पोलीस आयोग
- उद्ध्वस्त बालपण - प्राथमिक शिक्षणविषयक
- शापित - आरे कॉलनी येथील आदिवासींच्या समस्या (लेखक - नितीन पाटील)
- वंचितांचे जिणं - वडार समाजाच्या समस्यांविषयी (लेखक - नितीन पाटील)
- महाराष्ट्र संदर्भ पुस्तिका
- आपला अर्थसंकल्प (लेखक - हेमंत देसाई)

- आघाडी सरकारचा पंचनामा प्राथ.आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, आश्रमशाळा,पोलीस ठाणी व निवासस्थाने
- बंदिवासातील पोलीस आयोग
- विधिमंडळ अर्थसंकल्पीय कामकाज - नियम व वास्तव (मार्च, २०१२)
- आपले विधिमंडळ - 'संक्षिप्त परिचय' (जानेवारी २०१३)
- अमृत महोत्सवी विधिमंडळ
- संक्षिप्त टिपण: कुपोषण बालकांचे नव्हे तर . . शासन व्यवस्थेचे! ★ आश्रमशाळांची दुरवस्था . . ★ शासनाची अजून कोरीच पाटी, आमच्या हाती मात्र विटा-माती ★ साहेब, आमच्या पाठीवर दप्तर कधी येणार ?
- विभागवार वार्षिक अर्थसंकल्पीय टिपण : सर्वसाधारण अर्थसंकल्प, आदिवासी विकास, सामाजिक न्याय, सार्वजनिक आरोग्य, शालेय शिक्षण, महिला व बाल कल्याण, कृषि, गृह, रोजगार व स्वयंरोजगार, उद्योग, ऊर्जा व कामगार इ. विभाग.
- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पाचा विश्लेषणात्मक अहवाल.
- महाराष्ट्र विधिमंडळ - प्रभावी कामकाजासाठी (संक्षिप्त मार्गदर्शिका) (डिसेंबर २०१४)
- केळकर समितीचा अहवाल-संक्षेपात (महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील) (मार्च २०१५)
- आश्रमशाळांचे वास्तव - आधुनिक गुरुकुलात घेतले जात आहेत एकलव्यांचे अंगठे ( डिसेंबर २०१६)
- आदिवासींचे कोवळे जीव - मारेकरी कोण? (डिसेंबर २०१६)
- प्रकाशझोत -राज्यातील महत्त्वाचे प्रश्न माध्यमांच्या नजरेतून (डिसेंबर २०१६)